# विद्यापीठाच्या अर्थसंकल्पावर अभ्यास करण्यासाठी समिती

पुणे (प्रतिनिधी) : पुणे विद्यापीठाच्या शनिवारी मांडण्यात आलेल्या १०५ कोटी रुपयांच्या अर्थसंकल्पावर आज सभागृहात विस्तृत चर्चा होऊन अनेक सूचना व तुटीसंबंधी तसेच प्रस्तावित बदलासंबंधी अभ्यास करण्यासाठी एक समिती नेमण्यात आली आहे. डॉ. गजानन एकबोटे या समितीचे अध्यक्ष असून प्रा. एस. आय. पाटील हे या समितीचे सचिव आहेत, तर अन्य अकरा जण सदस्य आहेत. या समितीचे आज बैठक होणार असून येत्या आठवड्यात आपला अहवाल सादर करणार आहे.

दरम्यान या अर्थसंकल्पावर सदस्यांनी ज्या कपात सूचना मांडल्या, त्यातील काही स्वीकारल्या, तर काही सूचना संबंधित अधिकार मंडळाकडे देण्यात येणार आहेत, तसेच काहींमध्ये कुलगुरूंनी स्वत:हून भरघोस वाढ केली. अर्थसंकल्पीय समारोपाच्या भाषणात कुलगुरू डॉ. नरेंद्र जाधव यांनी विद्यार्थी, शिक्षक, महाविद्यालये, कर्मचारी या सर्वच घटकांसाठी विविध योजनांचा पाऊस पाडला.

धाडसी अर्थसंकल्प असे या अर्थसंकल्पाचे वर्णन करून डॉ. जाधव यांनी अर्थसंकल्पातील तूट भरून काढण्याचे अनेक उपाय सुचविले. त्यामध्ये विद्यार्थ्यांवर अजिबात बोजा टाकणार नसल्याचे आवर्जून सांगत सरकारकडील २५ कोटी येणे, युजीसीकडील ५०-६० कोटी येणे, परदेशी विद्यार्थ्यांच्या माध्यमातून महाविद्यालये संलग्नीकरण फी या माध्यमातून भरून काढणार असल्याचे सांगितले. दरम्यान विद्यापीठात यापूर्वी ज्या गोष्टी करायला हव्या होत्या त्या केल्या नसल्यामुळे आज एवढी तूट आल्याचे त्यांनी सांगितले.

अहमदनगर व नाशिक येथील विद्यापीठ कॅम्पसमधील जागा सरकारकडून मिळण्यासाठी प्रयत्न करणार आहे. बांधकामांसाठी असलेल्या १३७ कोटी रुपयांपैकी १० कोटी कोटी अंतर्गत सजावट व ६३ कोटी नवीन बांधकामांसाठी असल्याचे त्यांनी सांगितले. विद्यापीठाची मुख्य इमारत ही पुढील ५० वर्षात कोठेही धक्का लागणार नाही, अशी करणार असून देशातील टॉप टेन इमारतींपैकी करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

### विद्यार्थ्यांसाठी

- विद्यार्थी केंद्र स्थापन करून त्याअंतर्गत अभ्यासिका तयार करण्यात येणार आहे.
- विद्यार्थी सुविधा केंद्राची स्थापना (एकखिडकी योजनेप्रमाणे)
- एम. फिल.साठी ३ हजार व पीएच.डी.साठी ६ हजार रुपये विद्यावेतन देणार. ही योजना महाविद्यालयीन पातळीवर पूर्वलक्ष्यी प्रभावाने राबविणार
- विद्यापीठ कॅम्पसमध्ये 'सॉफ्ट स्किल प्रोग्रॅमसाठी १० लाखांची तरतूद
- विद्यापीठ पातळीवर प्लेसमेंट सेंटरसाठी १० लाख
- खेळासाठी २ कोटी १ लाख, तसेच राष्ट्रीय पातळीवर पारितोषिकप्राप्त खेळाडूंना क्रीडा शिष्यवृत्ती सुरू करणार. त्यासाठी १० लाख
- स्वतंत्र शिष्यवृत्ती सेलची स्थापना

### शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी

- नवीन भरतीसाठी दोन कोटी ४० लाखांची तरतूद
- प्रशिक्षणासाठी शिक्षकेतर कर्मचरी प्रशिक्षण केंद्र स्थापणार
- आरोग्य विम्यासाठी १ लाख रुपयांपर्यंतचा आरोग्य व अपघात विमा उतरवणार. त्यामध्ये आई-वडील व सासू-सासऱ्यांचाही समावेश
- गृहकर्जावरील व्याजासाठी १० लाख
- विद्यापीठ परिसरात सहा विसावा केंद्रे स्थापणार, विद्यार्थी मेस महिला बचत गटांकडे चालवण्यास देणार

### शिक्षकांसाठी

- शिक्षकांच्या सॉफ्ट स्किलसाठी 'टीचर्स ॲकॅडमीची स्थापना करणार. त्यासाठी १ कोटीची तरतूद
- दुबई येथे शिकविण्यास जाणाऱ्या शिक्षकांसाठी 'दुबई टीचर्स ॲकॅडमी'ची स्थापना
- प्राध्यापकांना आंतरराष्ट्रीय परिषदेत पेपर सादरीकरणासाठी २.५ लाख

### महाविद्यालयांसाठी

- ट्रिपल कनेक्टिव्हिटीअंतर्गत वेबपेज लर्निंग व गुणवत्ता सुधार योजनेचे सबलीकरण
- नाशिक व अहमदनगर कॅम्पसमध्ये अद्ययावत प्रयोगशाळा उभारणार. त्यासाठी प्रत्येकी दोन कोटी रुपये
- कायमस्वरूपी विनाअनुदानित ग्रामीण महाविद्यालयांसाठी १ कोटीची तरतूद

पुढारी 31/3/08

# F.Y. B.com. का पेपर आलंदी रोड पर स्थित जीएसएमटी कॉलेज से 'लीक' हुआ

## कुलगुरु डॉ. नरेंद्र जाधव ने दी जानकारी : होगी कड़ी कार्रवाई

**पुणे, 30 मार्च (आनंद प्रतिनिधि)**



एफ वाय बी कॉम का गणित का प्रश्न पत्र पुणे विश्वविद्यालय से नहीं बल्कि एक कॉलेज से 'लीक' हुआ. यह जानकारी पुणे विश्वविद्यालय के कुलगुरू डॉ. नरेन्द्र जाधव ने एक पत्रकार वार्ता में दी. इस अवसर पर विश्वविद्यालय के कुलसचिव माणिकराव जाधव, परीक्षा नियंत्रक श्री फिरंगे उपस्थित थे.

डॉ. जाधव ने बताया कि जैसे ही पेपर लीक होने की खबर हमारे पास पहुँची वैसे ही विश्वविद्यालय ने सतर्क होकर जांच शुरू कर दी. जाँच-पड़ताल में यह पता चला कि एफवाईबीकॉम का पेपर विश्वविद्यालय से नहीं बल्कि एक कॉलेज से लीक हुआ: परीक्षा विभाग अपने काम में पूरी सतर्कता बरतता है, लेकिन एक बार विश्वविद्यालय से कॉलेज को सीलबंद पेपर्स को भेजने के बाद आगे कि जिम्मेदारी संबंधित कॉलेज की होती है. इसलिए पेपर लीक मामले की जांच हेतु विश्वविद्यालय ने तुरन्त एक टीम नियुक्त की जिसने मामले की तह तक पहुँचने में कोई भी कसर नहीं छोड़ी और समय ना गंवाते हुए मामले की सच्चाई उजागर की. विश्वविद्यालय ने कॉलेज को भेजे गए सभी सीलबंद लिफाफे प्रात: सुबह दस बजे से पहले नहीं खोले जाते हैं. इसलिए हमने सभी पेपर्स मंगाए, तब पता चला कि एक कॉलेज में भेजे गए दस सीलबंद लिफाफों में से नौ ही सीलबंद लिफाफे वापस मिले. तब यह बात साफ हुई कि यह पेपर इसी कॉलेज से ही लीक हुआ है. परंतु कॉलेज ने कहा कि हमें नौ सीलबंद लिफाफे मिले व गलती से दस सीलबंद मिलने के दस्तावेज पर हस्ताक्षर किए गए, इधर पुलिस जाँच पड़ताल में यह बात सामने आई कि इसी कॉलेज से वह दसवां लिफाफा प्राप्त हुआ.

जब पत्रकारों ने कॉलेज का नाम बताने पर जोर दिया तो विश्वविद्यालय के परीक्षा नियंत्रक श्री. फिरंगे ने बताया कि पेपर लीक वडमुखवाड़ी आलंदी रोड पर स्थित जी.एस.एम.टी आर्टस् कॉमर्स एँण्ड साईन्स कॉलेज से हुआ है. आगे ऐसे मामले न हों इसलिए विश्वविद्यालय द्वारा एहतियाती सारे कदम उठाए गए हैं, जिसमें जांच टीम को जो संख्या बढ़ाई गई है, वहीं संबंधित कॉलेजों में पुलिस व्यवस्था भी की गई है. इधर पेपर लीक प्रकरण को लेकर पुलिस अपने स्तर पर जाँच-पड़ताल कर रही है. अब इस कॉलेज पर विश्वविद्यालय विशेष रूप से ध्यान देकर आगे की कार्रवाई करेगा. यह जानकारी भी डॉ. जाधव ने दी.

आज का आनंद 31/3/08

निलन इमेज मेकर्स